Kamala College Kolhapur, Krantiveer Rangraodada Patil Library
LIBRARY

A - 233

Total No. of Pages : 3

| Seat No. | |
|---|---|

# B.A. (Part - I) (Semester - II) Examination, April - 2018
## MARATHI (Compulsory) (Paper - B) (New)
## अभिव्यक्ती आणि उपयोजित मराठी
## Sub. Code : 61223

**Day and Date : Saturday, 07 - 04 - 2018** **Total Marks : 50**

**Time : 12.00 noon to 02.00 p.m.**

सूचना : 1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.
2) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

प्र.1) योग्य पर्याय निवडा. [10]

अ) सखुनानाने कोणत्या झाडाखाली छप्पर बांधले होते?

i) वडाच्या ii) पिंपळाच्या

iii) आंब्याच्या iv) चिंचेच्या

ब) सखुनाना छपरामध्ये बसून रोज कोणाला गोष्टी सांगायचा?

i) गावातील पोरांना ii) स्वतःच्या मुलांना

iii) नातवंडांना iv) निवेदकाला

क) 'ओळख' मधील मधुकरला कोणत्या ठिकाणी जायचे होते?

i) कुर्ल्याला ii) चेंबूरला

iii) बोरिबंदरला iv) मानखुर्दला

ड) 'ओळख' मधील मधुकर पाठारे कोणत्या बँकेत कारकून म्हणून नोकरी करीत होता?

i) महाराष्ट्र बँक ii) स्टेट बँक

iii) कॉसमॉस बँक iv) इंपीरियल बँक

*P.T.O.*

Kolhapur, Krantiveer Rangnodaji Patil Lib... College LIBRARY



इ) 'पैलतीरी' हा पाठ कोणत्या लेखिकेचा आहे?

i) विभावरी शिरूरकर ii) प्रिया तेंडूलकर

iii) गोदावरी परूळेकर iv) मालतीबाई किर्लोस्कर

फ) गोदावरी परूळेकरांनी ठाणे जिल्ह्यातील कोणत्या आदिवासी समाजासाठी संघर्ष केला?

i) वारली ii) कोरकू

iii) भिल्ल iv) गोंड

य) गोदावरी परूळेकर कोणत्या पार्टीच्या कार्यकर्त्या होत्या?

i) काँग्रेस पार्टी ii) जनता पार्टी

iii) कम्युनिस्ट पार्टी iv) बहुजन समाज पार्टी

र) पिसाटापरी केस पिंजारूनी पृथ्वीकडे प्रेमाची याचना कोण करते?

i) शुक्र ii) मंगळ

iii) ध्रूव iv) धूमकेतू

ल) कोलंबसाचे गर्वगीत ही कविता कोणी लिहिली आहे?

i) केशवसुत ii) केशवकुमार

iii) कुसुमाग्रज iv) गोविंदाग्रज

व) कवी नारायण सुर्वे यांनी तळपती तलवार कोणाला म्हटले आहे?

i) शेतकऱ्याला ii) कामगाराला

iii) लोहाराला iv) सोनाराला

प्र.2) 'सखुनाना' या व्यक्तिचित्रणाच्या आधारे सखुनानाची स्वभाव वैशिष्ट्ये साधार स्पष्ट करा. [10]

किंवा

आदिवासी लोकांसाठी काम करताना गोदावरी परूळेकरांना कोणकोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते, ते 'पैलतीरी' पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

Kolhapur, Krantiveer Rangarao Patil Library LIBRARY

प्र.3) 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेमध्ये पृथ्वीची सूर्यावरील निष्ठा कशी व्यक्त झाली आहे? [10]

किंवा

कामगार आणि कष्टकरी स्त्री वर्गाचे चित्रण नारायण सुर्वे यांच्या कवितेतून कसे स्पष्ट झाले आहे?

प्र.4) 'स्वच्छ भारत अभियान' या विषयावर श्रुतिका लेखन करा. [10]

प्र.5) अ) पर्यटन व्यवसाय करणाऱ्या कंपनीची वृत्तपत्रासाठी जाहिरात तयार करा. [5]

ब) खालील अशुद्ध उतारा शुद्ध करून लिहा. [5]

सतराव्या शतकात होऊण गेलेला डेकार्ट हा पहिला विचारवंत असावा कि ज्याने माणसातील स्वत्वाच्या जाणीवेचे भाण ओळखले होते. आधूनिक जगाच्या आणी त्या जगात राहणाऱ्या, स्वत्वाची जाणीव असलेल्या माणसाबद्दलच्या वीचाराला खरी चालना डेकार्टपासूनच मीळाली असे मानले तर ते अतिशयोक्त ठरणार नाही. डेकार्टने केवळ मानुस हा विचार करणारा प्रानि आहे. एवढेच सांगितले नाही तर तो स्वत:च्या विचारांचाही विचार करणारा कसा आहे हे स्पष्ट केले. मानुस हा केवळ स्वत:चे निरीक्षण करीत नाहि तर ज्या वेळी तो स्वत:च्या निरीक्षकाच्या भूमिकेत असतो, त्याच वेळी तो त्या भूमिकेचेही निरीक्षण करीत असतो. डेकार्टच्या या विचारांनी माणसाबद्दलच्या चिंतनाला एक नवी दीषा देण्याच्या प्रयत्नांचा पाया घातला.